MHND250004182020

| | | |
|---|---|---|
| दाखल केल्याचा दिनांक | – | ०२.१२.२०२० |
| नोंदणी केल्याचा दिनांक | – | ०२.१२.२०२० |
| पारीत केल्याचा दिनांक | – | १०.०६.२०२६ |
| कालावधी | – | वर्ष महिना दिवस<br>०५ ०६ ०८ |

**उमरी येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, उमरी यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी के.एस.कुलकर्णी)**

**नियमीत फौजदारी खटला क्र.९५/२०२०**

**नि.क्र.४४.**

**भाग–अ**

| | |
|---|---|
| **प्रथम खबर तपशिल** | उमरी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. १८७/२०२० चा भा.द.वि. कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६, सहकलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. |
| **अभियोगपक्ष** | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत – पोलीस ठाणे अंमलदार,<br>उमरी पोलीस ठाणे, |
| **सरकारी अधिवक्ता** | श्री एन.एम. मगदुम,<br>सहा. सरकारी अभियोक्ता |
| १. | **प्रकाश दिगांबर पवळे,**<br>वय– ४० वर्षे, व्यवसाय–शेती. |
| २. | **गंगाधर दिगांबर पवळे,**<br>वय– ३५ वर्षे, व्यवसाय–शेती.<br>दोघे रा. कारला ता. उमरी जि. नांदेड. |
| **आरोपींतर्फे अधिवक्ता** | श्री. ई.एस. रामतीर्थकर. |

**भाग–ब**

| | |
|---|---|
| **गुन्हा घडल्याची तारीख** | ०२.०९.२०२० |

| | |
|---|---|
| **प्रथम खबरीचा दिनांक** | ०३.०९.२०२० |
| **दोषारोपपत्राचा दिनांक** | ०२.१२.२०२० |
| **दोषारोप ठेवल्याचा दिनांक** | २५.०९.२०२३ |
| **पुरावा सुरु झाल्याचा दिनांक** | १६.०२.२०२६ |
| **न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक** | --- |
| **न्यायनिर्णयाचा दिनांक** | १०.०६.२०२६ |
| **आदेशाचा दिनांक** | १०.०६.२०२६ |

**<u>आरोपींचा तपशिल</u>**

| **आ.क्र.** | **आरोपीचे नांव** | **अटकेची तारीख** | **जामीनवर मुक्त केल्याची तारीख** | **आरोप** | **दोषी अगर निर्दोष** | **शिक्षा** | **फौ.प्र.स. चे कलम ४२८ अन्वये करीताचा अटकेचा कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रकाश दिगांबर पवळे | १५.०९. २०२० | ०४.०९. २०२० | भा.द.वी कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६, सहकलम ३४ | निर्दोष मुक्त | नाही | - |
| २. | गंगाधर दिगांबर पवळे | ०३.०९. २०२० | --- १५.०९. २०२० | --- | --- | --- | --- |

**<u>न्यायनिर्णय</u>**
**<u>( पारीत दिनांक १० जुन, २०२६ )</u>**

आरोपींविरुध्द **भारतीय दंड संहितेचे कलम** ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ प्रमाणे खटला चालविण्यात आला.

**<u>अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की,</u>**

२. दिनांक ०२.०९.२०२० रोजी फिर्यादी व त्यांचे वडील नेहमी प्रमाणे शेतात काम करुन सायंकाळी ०५ वाजण्याच्या सुमारास सामाईक धुऱ्यावरील दगड उचलून ठेवू लागले. त्यावेळी आरोपी क्र.१ व २ यांनी हे त्यांच्यावळ येवून 'हे दगड तू का उचलेस, जसे च्या तसे राहु दे, तुला लय माज आलाय' असे म्हणून अंगावर धावून आले. त्यावेळी

आरोपी क्र.१ यांनी फिर्यादीस लाकडाने डोक्यात मारुन डोके फोडले. त्यामुळे त्यांच्या डोक्यातून रक्तस्त्राव झाला. तसेच, आरोपी क्र.२ याने दगडाने मारहाण करुन मुक्का मार दिला. त्यावेळी फिर्यादीचे वडील व काका भांडण सोडवण्यासाठी आले असता त्यांना देखील आरोपींनी लाथाबुक्यांनी मारहाण करुन 'तुम्हाला तर जिवंत मारतो' अशी जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने उमरी पोलीस स्टेशनला घटनेची फिर्याद दिली.

३. त्याप्रमाणे, उमरी पोलीस ठाणे येथे **गुन्हा नोंद क्र. १८७/२०२०** चा भा.द.वि. कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पो.ना/१९८२ श्री. जी.एस.सरोदे, उमरी पोलीस स्टेशन यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले, घटनास्थळ व जप्ती पंचनामा करुन तपासाअंती त्यांनी आरोपींविरुध्द भा.द.वि कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पुर्वाधिकारी यांनी आरोपींविरुध्द (**नि.क्र.२५**) प्रमाणे भा.दं.वि. ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये दोषारोप निश्चित केले. आरोपींस दोषारोप त्यांच्या भाषेत वाचून व समजावून सांगितला. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले.

५. फिर्यादी व साक्षीदाराच्या साक्षीपुराव्यात आरोपींविरुध्द दोषदर्शित पुरावा मिळून न आल्याने, आरोपींचे भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ३५१ प्रमाणे निवेदन नोंदवण्यात आले नाही.

६. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद उपलब्ध पुरावा यांचे अवलोकन केल्यानंतर खालील मुद्दे माझे विचारासाठी उपस्थित होतात. त्या मुद्दयांवरील निष्कर्ष कारणांसहीत मी खालीलप्रमाणे नमूद करीत आहे.

| <u>अ.क्र.</u> | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | दिनांक ०२.०९.२०२० रोजी सायंकाळी ०५.०० वाजता फिर्यादीच्या शेतामध्ये मौजे कारला ता. उमरी | |

| | | |
|---|---|---|
| | जि. नांदेड येथे आरोपींनी संगणमत करुन आरोपी क्र. १ यांनी फिर्यादीस लाकडाने डोक्यात मारुन जबर दुखापत करुन त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ३२६** सहकलम **३४ अन्वये** गुन्हा केला, असे अभियोगपक्षाने सिध्द् केले काय? | **नाही.** |
| २. | उपरोक्त कालावधीत व ठिकाणी, आरोपींनी संगणमत करुन आरोपी क्र. २ ने फिर्यादीस ने दगडाने मुक्कामार देवून ईच्छापुर्वक दुखापत करुन त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ३२४ सहकलम ३४ अन्वये** गुन्हा केला, असे अभियोगपक्षाने सिध्द् केले काय? | **नाही.** |
| ३. | उपरोक्त कालावधीत व ठिकाणी, आरोपींनी संगणमत करुन फिर्यादी व साक्षीदार यांना लाथाबुक्यांनी ईच्छापुर्वक मारहाण करुन त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ३२३ सहकलम ३४ अन्वये** गुन्हा केला, असे अभियोगपक्षाने सिध्द् केले काय? | **नाही.** |
| ४. | उपरोक्त कालावधीत व ठिकाणी, आरोपींनी संगणमत करुन सार्वजनिक शांतता बिघडविण्याच्या उद्देशाने फिर्यादी यांना प्रोत्साहीत करण्यासाठी शिवीगाळ करुन त्यांचा अपमान करुन त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ५०४ सहकलम ३४ अन्वये** गुन्हा केला, असे अभियोगपक्षाने सिध्द् केले काय ? | **नाही.** |
| ५. | उपरोक्त कालावधीत व ठिकाणी, आरोपींनी संगणमत करुन फिर्यादी यांना फौजदारीपात्र धाकदपटशा करुन जिवे मारण्याची धमकी देवून त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ५०६ सहकलम ३४ अन्वये** गुन्हा केला, असे अभियोगपक्षाने सिध्द् केले काय ? | **नाही.** |
| ६. | काय आदेश ? | **आरोपींना दोषमुक्त करण्यात येत आहे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा १ ते ५ साठीः–**

७. मुद्दा क्र.१ ते ५ संबंधीत आलेला अभियोगपक्षाचा पुरावा एकसारखा असून संक्षिप्ततेकरिता मुद्दा क्र.१ ते ५ यांचे मी एकत्रीत विवेचन करुन उत्तर देत आहे.

८. आरोपींवर ठेवलेले आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने सादर केलेल्या साक्षी पुराव्यांचे विवेचन करण्याआधी एक बाब नमुद करणे आवश्यक वाटते ती म्हणजे फिर्यादी **(सा.क्र.१)** व आरोपी यांनी त्यांचेमध्ये प्रस्तुत प्रकरणात तडजोड झालेली असल्याचे त्यांच्या उलटतपासात नमुद केले आहे.

९. यासंदर्भात, फिर्यादी **(सा.क्र.१)** व जखमी **नागेश (सा.क्र.२)** यांनी त्यांच्या साक्षीदरम्यान अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा दिला नसून अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचा उलटतपास घेतला. परंतु, उलटतपासादरम्यान देखील त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही.

१०. आरोपीच्या वकीलांनी जरी **(नि.क्र.४०)** कडील घटनास्थळ पंचनामा व **(नि.क्र.४१ ते ४३)** कडील वैद्यकिय प्रमाणपत्र स्वीकृत केले असले तरी त्याला पृष्ठी देणार प्रत्यक्षदर्शी पुरावा अभिलेखावर नाही.

११. कायद्याच्या प्रचलित तत्वानुसार फौजदारी खटल्यांमध्ये आरोपींच्या दोषसिध्दीकरीता साक्षीपुराव्यामधुन अपराधाची बाब निसंशयातीतरीत्या सिध्द होणे अत्यावश्यक आहे. सबब, फिर्यादी **(सा.क्र.१)** आरोपींमधील झालेल्या तडजोडीच्या अनुषंगाने आलेला अभिलेखावरील पुरावा पाहता मी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, आरोपींवर ठेवलेले आरोप सिध्द होत नाहीत. म्हणुन, मी **मुद्दा क्र.** १ ते ५ चे उत्तर **नकारार्थी** देत आहे.

**मुद्दा क्र. ६ करीताः-**

१२. आरोपींवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द न झाल्यामुळे त्यांना खटल्यामधून दोषमुक्त करणे न्यायोचित आहे. सबब, **मुद्दा क्र.६** च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत

आहे.

## आ दे श

१. आरोपी **१. प्रकाश दिगांबर पवळे, २. गंगाधर दिगांबर पवळे** यांना **भारतीय दंड संहितचे कलम** ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वयेच्या दोषारोपातून भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७१(१) अन्वये निर्दोषमुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन कदबे व जात मुचलके रद्द करण्यात आहेत.

३. आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ अनुसार रक्कम **रु.७,५००/–** प्रत्येकी प्रमाणे जात मुचलका व जामीन कदबा द्यावा.

४. जप्त मुद्देमाल 'एक गैरी जातीचे लाकुड (काठी) एका बाजूने थोडे जाडसर व एक अंदाजे ५०० ग्रॅम वजनाचा ओबडधोबड आकाराचा दगड मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नाश करण्यात यावा.

५. प्रस्तुतच्या न्यायनिर्णयाची प्रत मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांना देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर)

KULDIP SUBASHRAO KULKARNI

Digitally signed by KULDIP SUBASHRAO KULKARNI
Date: 2026.06.10 14:38:23 +0530

दिनांक- १०.०६.२०२६.
ठिकाण- उमरी

**( के.एस.कुलकर्णी )**
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, उमरी.

## परिशीष्ट

### भाग-क

### अभियोगपक्ष/आरोपीपक्ष/न्यायालयापक्षाचे साक्षीदारांची यादी

| अनुक्रमांक | नांव | नि.क्र. | प्रकार |
|---|---|---|---|
| १. | घनशाम दत्ता पवळे | ३५ | फिर्यादी |
| २. | नागेश हरी पवळे | ३६ | साक्षीदार |

## अभियोगपक्ष/आरोपीपक्ष/न्यायालयापक्षा यांचे कागदपत्रांची निशाणी यादी

| अनुक्रमांक | निशाणी क्र. | तपशिल |
|---|---|---|
| --- | --- | --- |

## भौतिक वस्तु

| अ.क्र. | स्वरुप |
|---|---|
| १. | एक गैरी जातीचे लाकुड (काठी) एका बाजूने थोडे जाडसर |
| २. | एक ओबडधोबड आकाराचा अंदाजे ५०० ग्रॅम वजनाचा दगड |

KULDIP SUBASHRAO KULKARNI
Digitally signed by KULDIP SUBASHRAO KULKARNI
Date: 2026.06.10 14:38:28 +0530

दिनांक- १०.०६.२०२६.
ठिकाण- उमरी

**( के.एस.कुलकर्णी )**
न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, उमरी.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | L.P. Telang, Stenographer Gr.II<br>(On Deputation) |
| Court | - | CJJD & JMFC Umri |
| Date | - | 10.06.2026 |
| Order signed by the Presiding Officer on | - | 10.06.2026 |
| Order uploaded on | - | 10.06.2026 |